ISSN 2231-1629 Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# गृह–अर्थशास्त्राच्या विविध शाखा आणि दैनंदिन जिवनात उपयुक्तता

**प्रा. कविता आर. किर्दक**
*शि. प्र. मं. विज्ञान व गिलाणी कला, वाणिज्य महाविदयालय*
*घाटंजी*

प्रस्तावणा :
गृहअर्थशास्त्र हे उपयोजीत भाास्त्र असल्यामूळे मानवी जिवन प्रगत करण्याचा एक महत्वपूर्ण भाग असे या विशयाचे मुल्यांकन करता येते. विशयात कुटूंब संचलनाशी संलग्नीत सर्व बाबींचा अभ्यास करता येतो. ज्ञान, कौ ाल्य उपयोजनक्षमता ही गृहअर्थशास्त्राची गुणवैशिष्टे आहेत. हा विषय विविधांगी शाखांनी संपन्न आहे. ज्यात आहार पोषणशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, मानवी संबध, गृहविज्ञान–विस्तार, ग्राहक उपभोक्ता, अर्थशास्त्र, या शिवाय प्राप्त संसाधनांचा अधिक चांगला उपयोग करून समाधान मिळविणे, कलात्मक दृष्टी विकसीत करणे. सौंदर्यदृष्टी आत्मसात करण्याचे स्त्रोत, सामाजिकशास्त्राची आणि अंगीकार क्षमता, गृहसंचालना करीता मार्गदर्शन या विविधांगाने समृध्द असणारा अर्थ या विषयात सामावला जातो.

गृहअर्थशास्त्र या विशयाचा संबध मानवी जिवणाच्या सर्व अंगाशी जोडल्या जातो. मानवी जीवन अधिक समृध्द करण्याचे शिक्षण देणारा हा विषय आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे नविन बदल स्विकारणे अपरिहार्य ठरत आहे. म्हणूनच दैनंदिन जिवनात प्रगतीपथ दाखविणारा विशय म्हणजे गृहअर्थशास्त्र होय. कारण या विशयाचे अंतरंग जिवन शिक्षणाची संकल्पना केंद्र मानून साकारले आहे. जिवनातील मुलभूत गरजांचे तसेच प्रगत जिवन साकार करण्याचा सकस दृष्टीकोन या विषयाच्या शिक्षणातून प्राप्त होतो.

**गृहअर्थशास्त्राची व्याख्या :**
गृहअर्थशास्त्र हे जिवनाचे शिक्षण आहे, कारण यामधे घर व कुटूंब यांच्याशी संबधीत सर्व विषयाचे अध्ययन केले जाते. (डॉ.देवदास)

''व्यक्तीला स्वतःची शारिरीक आणि मानसिक ओळख पटऊन देऊन जिवन विशयक शिक्षण देणारा तसेच अर्थार्जनाकरीता मदत करणारा विषय म्हणजे गृहअर्थशास्त्र होय.''(डॉ.टोंडफर)

**अन्नशास्त्र आणि पोषणशास्त्र** :
मानवी जिवनाच्या अस्तीत्वासाठी अन्नाची गरज असते. आहारशास्त्राच्या शिक्षणामुळे आहारविशयक गरजा, वय, ऋतु, याला अनुसरून आहाराच्या प्रकार व प्रमाणात बदल करण्याची आवश्यकता यांचे ज्ञान होते. औदयोगीकरण, तंत्रज्ञानाचा विकास यामुळे मानवी जिवन अत्यंत धावपळीचे आणि व्यस्त झाले आहे. त्याचा विपरीत परिणाम मानवीस्वस्थ्यावर होतांना आढळतो. आहार घेण्याच्या अनियीमत वेळा खाण्यापिण्याचा अयोग्य सवयी तसेच शारिरीक व मानसिक, बौध्दीक तणाव यामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, यासारखे आजार वाढत आहेत. या सर्वांचा परिणाम व्यक्तीचे स्वास्थ्य बिघडण्यास कारणीभूत ठरते.

आजारी अवस्थेत आहारोपचार कोणता ठरवा, कोणत्या खादयपदार्थाचा आहारात समावेश टाळावा कोणती पोषणतत्वे आहारात वाढवावीत या संबधीचे ज्ञान मिळण्यास अन्न व पोषणशास्त्र उपयुक्त ठरते. आरोग्य संपदा चांगली राहावी या करीता जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याचे शिक्षण आहाराशास्त्रातून मिळते. विकासाच्या अवस्थेप्रमाणे आहार योजना करणे व्यक्तीपरत्वे आहारविषयक बदल स्विकारून कुटूंबातील सदस्यांच्या गरजा पूर्ण करता येतात.

कुटूंबात सुख, समाधान नांदण्यास विविध मार्गापैकी अन्न आणि पोषणाास्त्र हा मार्ग अधिक समृध्द आणि दैनदीन जिवनात उपयुक्त ठरणारा आहे.

**वस्त्रशास्त्र** :
व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाला अधिक खुलविणारी बाब म्हणजे अनुरूप वस्त्र होय. वस्त्र ही प्राथमिक गरज असली तरी आज तीचा इतका मर्यादीत हेतू राहलेला नाही. नव–नविन तंत्रज्ञाना मुळे वस्त्रशास्त्रात अमुलाग्र परिवर्तन झालेले दिसते. वस्त्रशास्त्रात कपडे शिवणे, फॅशन डिझाईन करणे, विविध शिवणकामाचे प्रकार वापरून नाविण्य निर्माण करणे या बाबीचा अभ्यास केला जातो. कपडयांचा संग्रह आणि इस्त्री इत्यादी संबधीची भाास्त्रीय माहीती असल्यामुळे भावी गृहीणी आपल्या कुटूंब सदस्यांना कमी किमंती चांगले कपडे खरेदी करून अधिक आनंद देऊ शकते.

**मानव विकास :**
यालाच बालविकास या नावाने संबोधले जाते. या शाखेमध्ये केवळ बालकांच्या विकासाचा अभ्यास केला जात नसून मानवाच्या सर्वांगीन विकासाचा अभ्यास केला जातो. बालकांच्या जन्मापासून मुलांमध्ये परिपक्वता येण्याच्या काळा मधे त्यांच्यात शारिरीक, मानसिक, भावनिक परिवर्तने घडून येतात. वयाच्या अवस्थेनूसार हे बदल घडून येतात की नाही या संबधीचे ज्ञान मानवविकास भाास्त्रातून प्राप्त होते. शिशूचा आहार कपडे स्वास्थ्य त्यांच्या विकासाला अनुकूल वातावरण बालकांच्या दृष्टीने आरोग्यदायी सवयी बालकांची शब्द संपदा या संबधीची माहीती मिळते.
सृजान पालकत्व ही बाब कुटूंब आणि राष्ट्र यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. हा दृष्टीकोन प्राप्त होतो. या विषयाच्या अभ्यासामुळे भावी गृहीणींना कुटूंबसंस्था, कुटूंबाची कार्ये, पती पत्नी संबध, कौटूंबिक जिवन सुखी होण्यास मदत होते आणि दैनंदिन जिवनात उपयोग होतो.

**गृहव्यवस्थापन :**
गृहव्यवस्थापन हे कुटूंबसदस्यांच्या शारिरीक, मानसिक भावनीक बाबीवर परिणाम करते. कुटंबातील सदस्यांचया अवडी निवडी, योग्यता ज्ञान प्रवृत्ती, शक्ती, कौशल्य वेळ या सारखी मानवी साधने आणि भौतीक वस्तु पैसा सामुदायीक सोयी या अमानवीय, साधनसंपत्ती होय. या दोहोंचा समन्वय साधून निर्धारीत यश प्राप्त करता येते. त्यासाठी आपल्या जवळ कोणकोणती संसाधने आहेत. यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने गृहव्यवस्थापन फायदयाचे ठरते. कोणत्या गरजा तीव्र आहेत, त्यांना प्रथम क्रमांकाने गृहव्यवस्थापनात स्थान असते. तर बाकी गरजा त्या त्या प्रमाणे सोडविल्या जातात या प्रमाणे दैनंदिन जिवनात या शाखेचा उपयोग होतो.

**विस्तार शिक्षण आणि संवाद :**
विस्तार शिक्षण हा लोकांचा कार्यक्रम असतो. स्वतःची मदत, स्वतःच केली पाहीजे हे त्यातील प्रमुख धोरण असल्यामुळे लोकांना त्यांच्या विकासाची जाणीव करून देवून त्यांच्या करीता उद्दीष्टाधीष्टीत कार्यक्रम राबवून अपेक्षीत दिर्घकालीन वर्तन बदल घडवून आणन्यास प्रवृत्त केल्या जाते. विस्तार शिक्षणात संवाद हे मानसांची मने जोडणारे असावेत तसेच ग्रामस्थांना नावाच्या संबधी प्रेरणा देणारे असावेत अशा संवादातून विस्तार कार्यक्रम यशस्वी होण्यास मदत होते.

**ग्राहक उपभोक्ता अर्थशास्त्र :**
उपभोक्ता हा ग्राहक असतो कमी अधिक खरेदी करफन जिवनाच्या गरजा भागविल्या जातात. खरेदी करतांना वस्तुंचे ब्रॅड, प्रत जाणून घेणे गरजेचे असते. म्हणूनच एगमार्क, आयएसआय, यासारख्या ब्रॅडेड वस्तुंची खरेदी करतांना विश्वासार्हता निर्माण हाते. समाधानकारक खरेदी तर होतेच त्याच बरोबर संतोषाची भावना निर्माण होण्यास मदत होते.
आजच्या जाहीरातीच्या युगात प्रसारमाध्यमातून वस्तूंची सर्वांगीन माहीती मिळण्यास मदत होते, परंतू प्रत्येक वस्तुचा दर्जा तपासून पाहील्याशिवाय खात्रीलायक खरेदी होत नाही. म्हणून बाहय वेष्टनाने आकर्षक असली तरी त्यातील माल वस्तुचे अंतरंग याची माहीती करून घेण्याची जागरूकता गृहअर्थशास्त्राच्या शिक्षणातून प्राप्त होण्यास मदत होते.

**मानवी संबध :**
संघटन प्रवृत्ती ही मानवी संबध प्रस्तापिथ करणारी बाब आहे. परस्पर सहकार्यातून मानवी जीवन उज्वल करणे हा हेतू सफल होण्यास मदत होते. परस्परातील संबध जोपासणे ते मजबूत करणे या बाबींचे संक्रमण लहानपणापासून कुटूंबातून होऊन समाजात ते विस्तारीत झाल्याचे दिसून येते.
मानवी संबध हे रचनात्मक कार्याला आवश्यक बाब आहे. कौशल्ये विकसीत करणे हे मानवी जीवन समृध्द करण्यास गरजेचे असते. मानवी संबधाचा विचार करीत असतांना व्यक्तीमत्वाच्या घटकांचे ज्ञान कौटूंबिक जिवणाच्या आर्थिक घटकांशी असलेल्या संबधाचे ज्ञान समुहामध्ये राहण्यास आवश्यक मुलभूत प्रवृत्ती समायोजनशिलता सामंजस्य, देवाण घेवान संबधीचे ज्ञान मदत करण्याची प्रवृत्ती या बाबी विकसीत होणे गरजेचे असते. व्यक्ती, भेद, वय, पात्रता, आवड या बाबींचे महत्व क्षमता, मानवी संबध सदृढ करण्यास योगदान देतात.

**सारांश :**
गृहअर्थशास्त्र हे उपयोजीत विज्ञान आहे, या विषयाच्या माध्यमातून जिवन अधिक सुखी समाधानी आणि प्रगतशिल होण्यास मदत होते.
घर आणि समाज या मध्ये नियोजनशिल दृष्टीकोन सामाजिक स्तर या संबधीची माहीती प्राप्त होते गृहअर्थशास्त्र शिक्षणामुळे व्यक्तीचा दृष्टीकोन विशाल बनतो. सामाजिक परीवर्तना नूसार घरा मध्ये पुरक

वातावरण निर्माण करण्याची प्रवृत्ती निर्माण होते, घर आणि समाज हे परस्परावलंबी आहे. त्यामुळे त्यांच्या मुळे त्यांच्या सुसंवाद साधण्यास योग्य दृष्टीकोन विकसीत होण्यास मदत होते. आरोग्य, आनंद, मानवी संबध, या करीता गृह अर्थशास्त्राच्या शाखा व त्यांचे शिक्षण असणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


1. *फरकाडे त्रिवेणी व गोंगे सुलभा, कौटूंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि आंतर सजावट, पिंपळापूरे प्रकाशन, महाल नागपूर.*
2. *डॉ. जवंजाळ संगीता, डॉ. बेलूरकर किरण, कौटूंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट, श्रीसाईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर.*